

**भवरलाल जैन**
चेअरमन,
जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.

# जाणता उद्योजक

साहेबांना काय म्हणावं?

प्रबुद्ध उद्योजक, आधुनिक शेतकरी व शेतकऱ्यांचा कैवारी, सुजाण व्यापारी व यशस्वी राजकारणी, मुरब्बी व्यवस्थापक, अनुभवी संघटक, नेहमीच सगळ्याच क्षेत्रांत खेळाडू, चोखंदळ साहित्यप्रेमी, परस्पर संबंधांना जोपासणारा मित्र, दूरदर्शीपणानं आपल्या कुटुंबाची व्याप्ती दरदिवशी, दरमजली वाढवणारा प्रेमळ माळी, विराट वादळातही स्थितप्रज्ञ राहणारा, भल्या पहाटे उठून रवि-मित्राला अर्घ्यदान करणारा पर्यावरणी, तल्लख बुद्धिवादी, मोठमोठी स्वप्नं बघणारा व ती पूर्ण करण्यासाठी दिवस-रात्र एक करणारा द्रष्टा, वेळप्रसंगी शिष्टाचाराला बाजूला ठेवून आपसी ऋणानुबंधांना प्राथमिकता देणारा, शास्त्र-तंत्र यांच्याबद्दल कमालीची जिज्ञासा बाळगणारा, नेहमीच वास्तवाचा ध्यास व ध्यान ठेवून तोलून-मापून बोलणारा-चालणारा, संकटाची चाहूल... सावध पाऊल या मंत्रावर विश्वास ठेवणारा, बहुविध वैचारिक आदान-प्रदानावर विश्वास ठेवून आपले निर्णय स्वतःच घेण्यात पारंगत, अफाट स्मरण-श्रवणशक्ती बाळगणाऱ्या या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाला 'जाणता उद्योजक' नाही तर आणखी काय म्हणावं?

''भवरलाल जैन, जैन इरिगेशनचं मार्केट कॅपिटलायझेशन काय आहे?'' हा प्रश्न साहेबांनी मला विचारला. संध्याकाळची वेळ. दिल्लीतल्या त्यांच्या शासकीय निवासस्थानी आम्ही बसलो होतो. मी तर या प्रश्नानं चाटच पडलो. वेळोवेळी साहेब नेहमीच काही विचारत असतात. ''भवरलालजी, गेल्या तीन वर्षांत तुमच्या उलाढालीत किती वाढ झाली? म्हणजे तुमचा CAGR काय आहे? कपौंड रेट ऑफ ग्रोथ काय आहे?'' खरंतर मलाही दोन मिनिटं गोंधळल्यासारखं झालं. उत्तर द्यायचंच म्हणून मग मी शेवटी २६ टक्के आहे, असं म्हणून मोकळा झालो.

''भवरलालजी, तुम्ही कंपनीमधून पगार घेत नाही, असं सांगितल्याचं मला आठवतं. तसं जर आहे तर मग तुमचं व्यक्तिशः भांडवल कसं जमेल? कॅपिटल फॉर्मेशनच कसं होईल?'' या प्रश्नांनी तर मला भारावूनच टाकलं.

मी उत्तरलो, ''साहेब, ज्या कंपनीला आपण जन्म दिला, त्या कंपनीकडून पगाराची अपेक्षा करणं म्हणजे आपल्याच अपत्याकडून त्याचं पालनपोषण करण्यासाठी फी मागण्यासारखं नाही का? आणि तसं पाहायला गेलं, तर माझ्या गाड्या-घोडे, औषधांचा खर्च, माझ्या आजारपणातला देश-विदेशातला खर्च कंपनी करतच असते. आणखी वेगळा पगार घेऊन काय करायचंय?''

''तसं नाही भवरलालजी, व्यवसाय जर वाढवायचा असेल

तर भांडवल हे लागतंच. तुमचं स्वतःचं भांडवल नसेल, तर तुमच्या कंपनीचा विकासदर कमी कमी होत जाईल, किंवा कंपनीत असलेला तुमचा भाग-हिस्सा डायल्युशन होत घटत जाईल. इतर लोक तुमच्या कंपनीला टेक-ओव्हर म्हणजे गिळंकृत करणार नाहीत, असं नाही का वाटत तुम्हाला?''

या प्रश्नावरून साहेब किती लांबचा, किती खोलवरचा विचार करतात, तोही मैत्रीपोटी, याची जाणीव झाली आणि मी जवळपास गहिवरलोच.

स्वतःला सांभाळत, सावरून मी म्हणालो, ''साहेब, तुम्ही म्हणता ते खरं आहे; पण आयुष्याच्या संध्यावस्थेत हा विचार कार्यरूप करणं मला प्रशस्त वाटत नाही. मला चार मुलं आहेत. ती तर पगार, कमिशन घेतातच ना? मी माझ्या वैयक्तिक गरजा कमी करण्याचा सातत्यानं प्रयत्न करायचं ठरवलंय.''

''भवरलालजी, तुमच्या भावना मी समजू शकतो; परंतु तुम्हाला वाटतंय तेवढं हे सोपं नाही!'' साहेब काहीशा चिंतावत निराशेच्या भावनेनं बोलत होते. असे एक नाही अनेक प्रसंग स्मरणात आहेत. साहेबांमधला उद्योजक किती सखोल अभ्यास करणारा आहे, चिंतन करणारा आहे, याची जाणीव मग आपल्याला होते.

साहेबांना मी एकदा आमच्या नव्यानंच उभारलेल्या फळ-भाजीपाला प्रक्रिया कारखान्याची धावती ओळख करून देत होतो. सगळं निरखून पाहून झाल्यावर साहेब म्हणाले, ''भवरलालजी, हा प्रकल्प हाती घेण्याआधी तुम्ही मला एक प्रश्न विचारला होता, की 'हा प्रकल्प उभारू का नको?' त्या वेळी मी एवढंच म्हणालो होतो, की भवरलालजी, हा विषय फार गहन आहे. लहरी निसर्ग आणि शासकीय धोरणांमधली अस्थिरता आणि त्याच्या जोडीला नेहमीच बदलणारी बाजारपेठ हे सर्व लक्षात घेता या अशा प्रकारच्या कारखानदारीकडे आपण स्वतः जातीनं लक्ष घालून जरा सांभाळूनच घ्यावं हे बरं!''

आता मी आपणास खरं तेच सांगतो. या कारखान्यामध्ये पहिल्या पाच वर्षांत व्याज वगैरे सर्व पकडून जवळपास पन्नास कोटी रुपयांचा घाटा झाला. खरंतर संपूर्ण कंपनी आर्थिकदृष्ट्या गर्भगळित झाली. साहेबांनी वेळीच दिलेला सल्ला मी मानला असता तर बरं झालं असतं, नाही का? असा विचार माझ्या मनालाही चाटून गेला; परंतु पुढे जाता फळ-भाजीपाल्याचे भावही सुधारले. आमचंही या विषयातलं कौशल्य व ज्ञान वृद्धिंगत झालं व शेवटी ही कारखानदारीही नफ्यात आली. प्रवास खडतर तर होताच पण खूपच लांबला. साहेबांच्या द्रष्ट्या उद्योजकाचा प्रेमाचा सल्ला मानून थांबलो असतो, तर बरं झालं असतं, असं वारंवार वाटत होतं. परंतु 'एकदा उखळात डोकं टाकल्यावर घाव मोजायचे नसतात' हा माझा हट्टी स्वभाव आड आला. अर्थात, जबाबदार तर मीच होतो. कालांतरानं का होईना, आज हा विषय मार्गी लागून कारखानदारी नफ्यात चालत आहे. अधूनमधून चटके बसतातही; पण ते सहन करण्याची शक्ती मात्र आता कमावलेली आहे, हेही तितकंच खरं आहे. या उद्योगपतींमधला हा संवाद आणि त्याच्यानंतरचा इतिहास बरंच काही सांगून जातो नाही का?



शेतकऱ्यांना भरगच्च भाव मिळवून देणं, त्यासाठी शासकीय दरबारात खळबळ माजवणं, प्रसंगी आपल्या पद-प्रतिष्ठेला पणालाही लावणं, हे सर्वच खेळ साहेब शेतकऱ्यांच्या भल्यासाठी सातत्यानं खेळत असतात. कर्जमाफी, घरबसल्या फुकट पैसा, अशा विषयांना साहेबांचा पाठिंबा नसतो; परंतु अल्पकाळ का होईना, शेतकऱ्यांचं भलंच होणार आहे, असं मानून साहेब दोन पावलं मागेही सरकतात. या सर्व गदारोळात साहेबांनी शेतकऱ्यांच्या खिशात जेवढे पैसे टाकले, तेवढे त्यांच्या आधी

कोणत्याही कृषिमंत्र्यांनी टाकले नसावेत. हे माझं ठाम मत आहे. त्यांचे काही डावपेच चुकतातही; परंतु त्यामागची भूमिका शेतकऱ्यांचं भलं करणं, शेती आधारित उद्योग-व्यवसायांना हातभार लावणं अशीच असते. साखर उद्योगाला जर कुणी गोड ठेवलं असेल तर ते फक्त साहेबांनीच. त्यांच्या हितचिंतक मित्रांना, साहेबांनी या व्यवसायाला पदोपदी मदतच केली याचं कारण 'साहेबांचं राजकारण' असंही म्हटलं जातं. त्यात थोडंफार तथ्यही असू शकेल. परंतु शेत, शेती, शेती व्यवसाय आणि उद्योग यांच्यासाठी झुकतं माप देणं हे कृषिमंत्र्यांचं कर्तव्यच नाही का? त्यांनी उगाच सॉफ्टवेअर, टेलिकॉम, टुरिझम असल्या विचारांमध्ये डोकं खुपसण्याची गरज आहे? कृषिमंत्री असताना त्यांनी शेती आणि शेत-उद्योग यांचाच ध्यास बाळगला पाहिजे, याबद्दल दुमत नसावं. कृषिमंत्र्यांचा तो उद्योगच आहे आणि साहेब तर उद्योजक कृषिमित्र आहेत. पंतप्रधानांसह कुणी इतरांनीसुद्धा त्यांच्याकडून यापेक्षा वेगळी अपेक्षा करणं वास्तवाला धरून नाही व साहेबांच्या स्वभावाला जर न पचण्यासारखं काय ते, होणं नव्हे!

साहेबांनी कोणत्याही परिषदेचं, संमेलनाचं, चर्चासत्राचं, उद्घाटनाचं आमंत्रण स्वीकारलं नाही, असं मला आढळलेलं नाही. जिथे जिथे जे जे नावीन्यपूर्ण असेल, ते ते आत्मसात करण्याच्या त्यांच्या वृत्तीचा अनुभव मला अनेक वेळा आलेला आहे. देशभरातून बोलावलेल्या शास्त्रज्ञांच्या व तंत्रज्ञांच्या एका अशाच भल्यामोठ्या मीटिंगला येण्याबद्दल साहेबांनी मला विचारलं. मला थोडं आश्चर्यच वाटलं. एका शासकीय मीटिंगला साहेब आपल्याला आमंत्रित करत आहेत, ही गोष्ट जरी योग्य असली तरी सरसकट होणारी नव्हती. त्या मीटिंगमध्ये मी साहेबांच्या विचारांची खोली अनुभवली. त्यांच्या व्याप्तीचं निरीक्षण जे त्यांनी केलं ते शब्दातीत आहे. सर्व शास्त्र-तंत्र यांच्या सादरीकरणाला त्यांनी जो प्रतिसाद दिला तो एखाद्या चोखंदळ उद्योजकालासुद्धा मागे टाकेल असा होता. हाडाचा जरी शेतकरी असला तरी अभ्यासानं, वाचनानं व संगतीनं हा माणूस उद्योजक-व्यापारीच आहे, अशी माझी खात्री झाली. त्या प्रसंगी त्यांनी विचारलेले खोचक प्रश्न, सगळ्यांचं सगळं ऐकून समजून दिलेली उत्तरं व निर्णय, काही उद्योजकांनी तोंडात बोट घालावं असेच होते.

नावीन्याचा ध्यास हा तर त्यांच्या स्वभावाचा अविभाज्य घटकच आहे. क्षेत्र कोणतंही असू द्या, जे काही जिथे जिथे नवीन असेल ते इथे आणलंच पाहिजे, आपल्या शेतकऱ्यांपर्यंत पोचलंच पाहिजे, या विचारांनीच ते नेहमी अस्वस्थ असतात. जगभर हिंडून असल्या सर्व बाबींचा अभ्यास करणं हा तर त्यांचा छंदच आहे. देश ब्राझील असो वा इस्राईल वा अमेरिका, त्यांची दृष्टी सर्वंकष व चौफेर फिरत असते. भारताला त्यांच्यातून काय घेता येईल, या विचारानं ते एवढे स्वकेंद्रित होतात, की त्यात भाव-ताव-खर्च-हिशेब-पैसा यांचं तारतम्यही ते विसरतात. ध्यास एकच असतो- हे भारताला चालण्यासारखं असेल तर ते इथे आलंच पाहिजे. या स्वभावामुळे त्यांच्यावर बऱ्याच वेळा शिंतोडेही उडतात; पण हे सगळं आपण स्वीकारलेल्या कामासोबत येणारं घबाड आहे, असं समजून ते आपल्या कामांना रेटत असतात. 'साहेब, हे सगळं आपल्या शेतकऱ्याला परवडण्यासारखं आहे का हो?' असा प्रश्न मी त्यांना बऱ्याच वेळा विचारला आहे. त्याचं उत्तरसुद्धा, ''भवरलालजी, आपला शेतकरी प्रयोगशील आहे. आधुनिकतेची त्याला कास आहे. भांडवली गुंतवणुकीला मात्र त्याच्याजवळ पुरेसा पैसा नाही हे खरंच. पण मग शासन नावाची संस्था आहे तरी कशासाठी? कुणासाठी? सर्वसामान्यांना मदतीचा हात देऊन पुढे आणल्याशिवाय आपण खऱ्या अर्थानं 'स्वतंत्र' झालो, असं होणारच नाही.''

हा त्यांचा पक्का 'फंडा' आहे.

प्रसंगी धोका पत्करणं, सामाजिक जीवनात, राजकारणाच्या धुमश्चक्रीत चिखलफेक ही तर होतच असते आणि होतच राहील. म्हणून भिऊन आपण काही करू नये असं नाही. अशा प्रकारचा धोका पत्करणं हासुद्धा प्रगल्भ उद्योजकाच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग आहे.

जिद्द, जिज्ञासा, धोका पत्करण्याची वृत्ती, कार्यपरायणता, नावीन्याचा ध्यास, मोठमोठी स्वप्नं पाहणं हे सारं काही साहेबांच्या व्यक्तिमत्त्वात बघायला मिळतं. मग मी साहेबांना उद्योजक न म्हणू तर काय म्हणू?